लोकसत्ता पु.पा.४०

# महामार्गावरील वाहतूक धोकादायक

## मार्गिकांच्या अभावाचा वाहनचालकांना फटका

**लोकसत्ता प्रतिनिधी**


**वसई** : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर माजी नगरसेवकाच्या झालेल्या मृत्यूमुळे काँक्रीटीकरणाचे काम किती धोकादायक बनले आहे त्याचा प्रत्यय आला. नियोजनाच्या अभावामुळे महामार्गावर अपघाताचा धोका वाढला आहे. वाहतुकीसाठी केवळ एक ते दीड मार्गिका सुरू राहत असून अनेक वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहन काढत असल्याने अपघात घडत आहेत.

वसई पूर्वेतील भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. मागील काही वर्षांपासून पावसाळ्यात महामार्गावर पडणाऱ्या खड्ड्यामुळे वाहतूक कोंडीला नागरिकांना सामोरे जावे लागत होते. याशिवाय अपघाताच्या घटना घडत होत्या. यासाठी महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावर १२१ किलोमीटरपर्यंतच्या रस्त्यावर व्हाइट टॉपिंग करण्याचे काम सुरू केले आहे. सद्यःस्थितीत मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर हे काम सुरू आहे. परंतु या कामादरम्यान वाहनांना ये-जा करण्यासाठीचे योग्य ते नियोजन न करण्यात आल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. या कोंडीतून सुटका व्हावी यासाठी काही वाहनचालक हे विरुद्ध दिशेने वाहने काढण्याचा प्रयत्न करतात, तर कधी कधी महामार्ग प्राधिकरणाकडून काही भागांत एकाच भागातून वाहतूक वळविली जाते. त्याचा फटका वाहनचालकांना बसत आहे.

नुकताच मालजीपाडा येथे विरुद्ध दिशेने जात असताना टेम्पो आणि चारचाकी वाहनाची धडक लागून अपघात घडला. यात माजी नगरसेवक श्याम पेंढारी यांचा मृत्यू झाला. अशा अनेक अपघातांच्या घटना आता महामार्गावर घडू लागल्या आहेत. महामार्ग प्राधिकरणाकडून वाहतूक नियोजन करण्याचा अभाव असल्याने या अपघाताच्या घटना घडत आहेत, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

### काँक्रीटीकरणाला तडे

महामार्गावरील काँक्रीटीकरणाला जागोजागी तडे गेल्याचे दिसून येत आहे. मुंबई वाहिनीवरील खराटतारा उड्डाणपुल ओलांडल्यानंतर आणि कोपर फाटा उड्डाणपुलांवर खड्डे पडल्याचे दिसून येत आहे. तर अनेक ठिकाणी ओल्या काँक्रीटवरून वाहने गेल्याने त्यांच्या चाकांचे वेडेवाकडे ठसे उमटल्याचे दिसत आहे. भामटपाडा चढावावर पेट्रोल पंपाच्या समोरच्या बाजूला असे झिगझॅग ठसे उमटले आहेत. त्यामुळे सुरू असलेल्या काँक्रीटीकरणाच्या दर्जावर यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.




### काँक्रीटीकरणाचे १४ टक्के काम

महामार्गावर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर काम सुरू करण्यात आले आहे. आतापर्यंत काँक्रीटीकरणाचे १४ टक्के इतके काम पूर्ण झाले असल्याची माहिती महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प निर्देशक सुहास चिटणीस यांनी दिली आहे. महामार्गावर काम सुरू असताना ये-जा करण्यासाठी दोन वाहिन्या सुरू असतात. त्याचे नियोजन आम्ही करीत आहोत. जे साहित्य रस्त्याच्या मध्ये पडून आहे तेसुद्धा तातडीने बाजूला करून स्वच्छता करावी अशा सूचना करण्यात आल्या आहेत, असेही चिटणीस यांनी सांगितले आहे.

### बांधकाम साहित्य अस्ताव्यस्त

महामार्गावर कामादरम्यान वापरण्यात येत असलेले साहित्यसुद्धा काम संपल्यानंतर जागच्या जागी पडून असते. विशेषत गोणी, सिमेंटचे ठोकळे, ब्लॉक, लोखंडी रॉड असे सर्व साहित्य पडून असल्यानेसुद्धा प्रवास करताना अपघात होण्याची भीती वाहनचालकांनी व्यक्त केली आहे.

लोकसत्ता पु-५-१.

# भाईंदर, वसई पोलिसांचा 'हेल्पलाइन ११२' राज्यात अव्वल

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** आपत्कालीन अवस्थेत नागरिकांकडून पोलिसांना मदतीसाठी केल्या जाणाऱ्या ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर त्वरित मदत पोहोचवण्यात मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालाय हे संपूर्ण राज्यात अव्वल ठरले आहे. गेल्या १५ महिन्यांपासून आयुक्तालयाने हा मान राखला असून अवघ्या साडेतीन मिनिटांत तक्रारांना मदत पोहचवली जात आहे.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली. यास आता जवळपास साडेतीन वर्ष पूर्ण होत आहे. तेव्हा अपुरे मनुष्यबळ, अपुरी साधनसामग्री असल्याने कुणी मदतीसाठी दूरध्वनी केल्यावर मदत पोहचवण्यास मोठा वेळ लागत होता. मात्र टप्प्याटप्प्याने पोलीस आयुक्तालयाने यंत्रणा उभारण्यास सुरुवात केली. तसेच शासनाने देखील नुकतेच जवळपास एक हजाराइतके मनुष्यबळ उपलब्ध करून दिले आहे.

त्यानुसार आयुक्तालाया अंतर्गत पोलिसांशी संपर्क साधण्यासाठी ११२ ही हेल्पलाईन दूरध्वनी सेवा अद्यावत करण्यात **(पान ३ वर)**

## यंत्रणेचे काम कसे?

सुरुवातीला हा दूरध्वनी नवी मुंबई येथील महाराष्ट्र राज्याच्या पोलीस नियंत्रण कक्षाला जोडला जातो. त्याठिकाणी तक्रार ऐकून घेतली जाते. ज्या पोलीस घटकांतर्गत हे प्रकरण आहे तेथे ते वर्ग होते. मिरा भाईंदर व वसई विरार पोलीस ठाणे हद्दीतील तक्रारी आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षाला सोपवण्यात येतात. एका विशेष सॉफ्टवेअरमध्ये दूरध्वनी केलेल्या नागरिकांचे लोकेशन पोलिसांना लगेच दिसून येते. शिवाय त्या भागात असलेल्या बीट मार्शलचे लोकेशन देखील सॉफ्टवेअरमध्ये दिसते. यावरून जवळ असलेल्या बीट मार्शलला घटनास्थळी जाऊन परिस्थितीची माहिती सॉफ्टवेअरमध्ये छायाचित्र व संक्षिप्त माहिती भरून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होत असल्यामुळे पोलिसांची मदत मिळाल्याचा कालावधी आपोआप दिसून येतो. काही महिन्यात क्रमांकाला पोलिसांबरोबर अग्निशमन व वैद्यकीय यंत्रणा देखील जोडण्यात आली असल्याची माहिती नियंत्रण कक्षातले अधिकारी प्रकाश कांबळे यांनी दिली आहे.

लोकसत्ता पु-५-४.

# बेकायदा बांधकामे जोमात?

## दुर्घटनेनंतरही महापालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसईतील बेकायदा बांधकामाची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतरही अशी बांधकामे सुरू असल्याचे दिसून येत आहे. दुर्घटनेनंतर पालिकेने फक्त दोन दिवस कारवाई केली, असा आरोप स्थानिक करत आहेत.

वसई पूर्वेच्या वाकणपाडा येथे बेकायदा बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून एका मजुराचा मृत्यू झाला होता; तर चार जण गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर महापालिकेने बेकायदा बांधकाम करणाऱ्या चार जणांवर गुन्हा दाखल केला होता. या दुर्घटनेनंतर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी शहरात नवीन बेकायदा बांधकामे होऊ दिले जाणार नाही, तसेच बेकायदा बांधकामांवर कडक कारवाई केली जाईल, असे सांगितले होते.

या दुर्घटनेनंतर महापालिकेने दोन दिवस अतिक्रमणांवर कारवाई केली, मात्र परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. बेकायदा बांधकामे रोखण्यात वसई महापालिका नेहमीच अपयशी ठरली असल्याचे सांगत महापालिका पुन्हा अपघाताची वाट पाहत असल्याचा आरोप भाजपचे माजी नगरसेवक किरण भोईर यांनी केला.



## अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

वाकणपाडा दुर्घटनेप्रकरणी जागा मालक, ठेकेदारावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. परंतु संबंधित प्रभाग समितीचे अभियंते आणि सहाय्यक आयुक्तांवर कारवाई झालेली. या सर्व जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शिवसेना जिल्हा प्रमुख निलेश तेंडोलकर यांनी केली आहे.

CamScanner

पुढारी पा.नं.१०.

# आता मागण्या मान्य होईपर्यंत शेतकरी आंदोलन

## शेतकरी संघटनांचा रामलीला मैदानावरील महापंचायत मेळाव्यात निर्धार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावरील महापंचायतीमध्ये आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. संयुक्त किसान मोर्चासह शेतकऱ्यांच्या ३७ संघटनांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. १३ फेब्रुवारीपासून पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी शंभू सीमेवर ठाण मांडले होते. शेतकरी मृत्यूनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर आंदोलनाची टप्प्याटप्प्याने धार वाढविण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर महापंचायत आयोजित केली होती.


पिकांना किमान हमीभाव (एसएमपी) मिळण्यासाठी कायदा करण्यासह अन्य विविध मागण्यासांठी त्यांनी केंद्र सरकारला इशारा दिला आहे. केंद्र सरकारने चर्चेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याची मागणीही या बैठकीमध्ये करण्यात आली.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीसह पंजाब आणि हरियाणामध्येही पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. शेतकरी संघटनेचे नेते राकेश टिकैत म्हणाले, हे सरकार तुम्हाला धमकावण्याचा प्रयत्न करेल. वाटेत वाहने अडवली जात आहेत; पण तुम्ही घाबरू नका.

या लोकांची नजर तुमच्या जमिनीवर आहे. जमीन वाचवण्यासाठी आंदोलन आवश्यक आहे. महापंचायतीत युनायटेड किसान मोर्चाने केंद्र सरकारच्या विरोधात ठराव मंजूर केला. आता ९ दिवसांनी शेतकरी प्रत्येक गावात लोकशाही वाचवा कार्यक्रमाचे आयोजन करणार आहेत.

### रणनीती ठरवू : टिकैत

राकेश टिकैत म्हणाले, ही महापंचायत मोदी सरकारच्या कॉर्पोरेट समर्थक, जातीयवादी, हुकूमशाही धोरणांविरुद्धचा लढा अधिक तीव्र करेल. तसेच शेती, अन्न सुरक्षा, उदरनिर्वाह आणि लोकांना कॉर्पोरेट लुटीपासून वाचवण्यासाठी संकल्प पत्र तयार केले जाईल. संघर्ष आणखी तीव्र करण्यासाठी महापंचायत योजना जाहीर करण्यात येणार असून, यात शेतकरी संघटनांसह केंद्रीय कामगार संघटना, प्रादेशिक महासंघ आदी संघटना सहभागी होणार आहेत.




**नवी दिल्ली : शेतकरी संघटनांनी रामलीला मैदानावर महापंचायत आयोजित केली होती.**

पुण्यनगरी ५-मा-१.

# बेकायदा दर्गा पाडण्याचे अप्पर तहसीलदारांचे आदेश

## सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याने प्रशासनाकडे कारवाईची मागणी

**मीरा रोड** : भाईंदर पश्चिम येथील उत्तन परिसरातील बालेशाह पीर दर्गा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. भाजप नेते ॲड. रवी व्यास यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून खारफुटी नष्ट करून उभारण्यात आलेल्या दर्ग्यावर प्रशासनाकडे कारवाईची मागणी केली होती. त्या मागणीनुसार अप्पर तहसीलदार निलेश गौंड यांनी दर्ग्याचे काम काढून घेण्याचे आदेश दिले आहेत.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन समुद्र किनाऱ्यावर बेकायदा दर्गा बांधण्यात आला आहे, तो सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे. पोलीस आणि गुप्तचर विभागानेही यासंदर्भात आपला अहवाल सादर केला आहे.

विशेष म्हणजे हे प्रकरण न्यायालयात पोहोचले असून, आता तहसीलदारांच्या या आदेशानंतर मीरा भाईंदर महापालिकेनेही याची दखल घेत संपूर्ण सहकार्य करणार असल्याचे सांगितले आहे. आम्ही कोणत्याही विशिष्ट धर्मविरोधात नसून, शहराच्या सुरक्षेबाबत आणि व्यसनमुक्ती अभियानाबाबत गंभीर असल्याचे रवी व्यास यांनी सांगितले आहे.

हा मुद्दा विधानसभेतही उपस्थित करण्यात आला आहे. दर्ग्याच्या नावाखाली लव्ह जिहाद आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेला प्रोत्साहन देण्याचे काम केले जात असल्याचा आरोप रवी व्यास यांनी केला होता. दर्गा ट्रस्ट कमिटी यापूर्वी देखील धार्मिक भावनांच्या आधारे अधिकृत करण्यासाठी तहसीलदारांकडे गेले होते. परंतु वैध कागदपत्रांच्या अभावामुळे आणि त्यांची याचिका मान्य न झाल्याने ती फेटाळण्यात आली होती. काही दिवसांपूर्वी रोहिंग्या बांगलादेशी लोकांनाही याच ठिकाणी अटक करण्यात आली होती. त्यामुळे शहराच्या सुरक्षेच्या चिंतेचे गांभीर्य अधिक स्पष्ट होते. आता तहसीलदारांनी दर्गा ट्रस्टला नोटीस बजावून बेकायदा बांधकाम स्वतःहून पाडण्याचे आदेश दिले असून, तसे न केल्यास २२ मार्चनंतर तोडण्याची कारवाई केली जाईल.

सकाळ ५-मा-३.

# मिरा-भाईंदरमध्ये सातवे पोलिस ठाणे

## काशीगाव ठाण्याचे फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण

भाईंदर, ता. १४ (बातमीदार) : मिरा-भाईंदरमधील काशीगावमध्ये सातवे पोलिस ठाणे आज (ता. १४) पासून कार्यान्वित झाले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पोलिस ठाण्याचे ऑनलाईन पद्धतीने लोकार्पण झाले. काशी-मिरा भागातील सिल्व्हर सरिता परिसरातील महापालिकेच्या वास्तूत हे पोलिस ठाणे स्थापन करण्यात आले आहे.



काशी-मिरा परिसरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. परिणामी येथील पोलिस ठाण्यावर कामाचा भार वाढत चालला होता. यासाठी काशीगाव या स्वतंत्र पोलिस ठाण्याची मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात प्रस्ताव नोव्हेंबरमध्ये गृह विभागाकडे पाठवण्यात आला होता. त्याला फेब्रुवारीमध्ये मान्यता मिळाली. त्यानंतर पोलिस ठाण्याच्या जागेसाठी शोध सुरू झाला होता. मिरा-भाईंदर पालिकेने सिल्व्हर सरिता परिसरात मंडईसाठी इमारत बांधली आहे; परंतु त्यात मंडई भरत नसल्याने ती रिकामी आहे. ही इमारत पोलिस ठाण्याला मिळावी, अशी मागणी पोलिसांकडून पालिकेकडे करण्यात आली होती. त्यानुसार पालिकेने भाडेतत्त्वावर ही इमारत काशीगाव पोलिस ठाण्याला दिली आहे.

**मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयातील पोलिस ठाण्यांची संख्या आता १८ झाली आहे. नव्या पोलिस ठाण्यामुळे काशी-मिरा पोलिसांवरील कामकाजाचा भार ५० टक्क्यांनी कमी होणार आहे.**
- मधुकर पांडे, पोलिस आयुक्त

काशी मिरा, मिरा रोड, नयानगर, नवघर, भाईंदर व उत्तन सागरी अशी सहा पोलिस ठाणी मिरा-भाईंदर परिसरात कार्यान्वित होती. त्यात काशीगावची भर पडली आहे. या वेळी पोलिस आयुक्तालयाला मिळालेल्या २० वाहनांचेही लोकार्पण करण्यात आले. आमदार गीता जैन, महापालिका आयुक्त संजय काटकर, भाजपचे ॲड. रवी व्यास आदी उपस्थित होते.

CamScanner

म. टा. पु. ५. १०.

## फरार आरोपीला प. बंगालमधून अटक

**मिरा-भाईंदर :** भाईंदरमध्ये आपल्या सहकाऱ्याची हत्या करून फरार झालेल्या आरोपीला पश्चिम बंगालमधून नुकतीच अटक करण्यात आली आहे. करीमुल्ला खान असे त्याचे नाव असून अवघ्या साडेचार हजारांसाठी त्याने हे कृत्य केल्याची कबुली दिली आहे.

नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १० जानेवारीला मोहम्मद अली नामक हा दारूच्या नशेत, जखमी अवस्थेत आढळून आला होता. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. हे प्रकरण संशयास्पद वाटल्यान पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी अलीचे त्याचा सहकारी करीमुल्ला यांच्याशी पैशाच्या देवाणघेवाणीवरून हाणामारी झाल्याचे समजले. करीमुल्ला त्यानंतर पसार झाला होता. त्यामुळे त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. दोन महिन्यांनंतर पश्चिम बंगालमधील सुलतानगंज येथून नवघर पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

# वेतन थकवणाऱ्या कंत्राटदाराला दणका

## भाईंदर पालिका आयुक्तांकडून कंत्राट रद्द

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर मनपाच्या अतिक्रमण विभागात कंत्राटी पद्धतीने घेण्यात आलेल्या मजुरांचे तीन महिन्यांहून अधिक वेतन कंत्राटदाराने थकविले आहे. या कंत्राटदराला महापालिकेने दणका दिला आहे. मनपा आयुक्त संजय काटकर यांनी त्याचे कामाचे कंत्राट केले आहे. कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन थेट त्यांच्या खात्यात जमा केले जाणार आहे. या कर्मचाऱ्यांचे वेतन थकल्याचे वृत्त 'मटा'ने मंगळवारी प्रसिद्ध केले होते. त्यानंतर प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली आहे.


तीन महिन्यांपासून वेतन थकले

मिरा-भाईंदर पालिकेच्या विविध विभागांप्रमाणेच अतिक्रमण विभागातही कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. म्हणून बेकायदा बांधकाम आणि फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी एका खासगी कंपनीकडून कंत्राटी पद्धतीने ७५ मजूर घेण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांना कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी-शर्तींनुसार दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत वेतन अदा करायला हवे. यासह कर्मचाऱ्यांचा विमा व भविष्यनिर्वाह निधी नियमित भरायला हवा. मात्र, कंत्राटदाराकडून यामध्ये कुचराई झाल्याचे दिसून आले.

कंत्राटी कर्मचाऱ्यांचा अनेक महिन्यांचा विमा व भविष्य निर्वाह निधी जमा करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे मनपाने कंत्राटदाराचे देयक थकवले. त्यानंतर कंत्राटदारानेदेखील तीन ते चार महिन्यांपासून कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले नाही. परिणामी कर्मचाऱ्यांना घर चालविणे कठीण झाले असून, ते वेतनाच्या प्रतिक्षेत होते. पालिका आयुक्त काटकर यांनी 'मटा'तील वृत्ताची दखल घेत तात्काळ, म्हणजे बुधवारी या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द केले आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन कंत्राटदाराला न देता, ते थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे देखील निश्चित करण्यात आले आहे. यासह कंत्राट रद्द झाल्याने कर्मचाऱ्यांना कमी न करता नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार मनपाकडून वेतन अदा केले जाणार आहे. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### धाबे दणाणले

मिरा-भाईंदर पालिका आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर काटकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचा व इतर सुविधांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. यात अटी-शर्तींचे उल्लंघन केले जात असल्याची बाब निदर्शनास आल्यास कंत्राट रद्द करण्याचा सपाट आयुक्तांनी लावला आहे. आतापर्यंत पाच ते सहा कंत्राटे रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहेत.

लोकमत पु.पा.४.

# काशिमीरा पोलिस ठाण्याचा भार होणार निम्म्याने हलका

## काशीगाव पोलिस ठाण्याचे फडणवीसांनी केले ऑनलाइन लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोड-महामार्ग परिसरातील काशीगाव पोलिस ठाण्याचे उद्घाटन व पालघर जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या २ कोटी १८ लाख २१ हजार रुपयांच्या निधीमधून एकूण २५ नवीन वाहनांचे लोकार्पण गुरुवारी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी ऑनलाइन लोकार्पण केले. काशीगाव पोलिस ठाणे सुरू झाल्याने काशिमीरा पोलिस ठाण्याचा भार निम्म्याने कमी होणार असल्याचे यावेळी पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी सांगितले.

यावेळी खासदार राजन विचारे, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर, अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, आमदार गीता जैन, माजी आमदार मुजफ्फर हुसेन आदी उपस्थित होते.



काशीगाव पोलिस ठाण्याचे उद्घाटन पार पडल्यानंतर या पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राहुलकुमार पाटील यांना उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

### २०२३-२४ मध्ये ४८ चारचाकी वाहने प्राप्त

१ पोलिस आयुक्तालयाच्या निर्मितीवेळी आयुक्तालयाकडे केवळ ६१ चारचाकी व ९९ दुचाकी वाहने उपलब्ध होती. जिल्हा नियोजन समिती ठाणे व पालघर यांच्याकडून २०२१ ते २०२३ दरम्यान ३३ चारचाकी व ८६ दुचाकी वाहने प्राप्त झालेली आहेत.

२ २०२३-२४ मध्ये ४८ चारचाकी वाहने प्राप्त झालेली आहेत. गुन्हे प्रतिबंधासाठी, आवश्यक गस्तीसाठी, महिला व बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये तपासाकरिता, डायल-११२ प्रणालीमध्ये मदतीसाठी, गुन्ह्यांचा तपासा व गुन्हेगारांचा शोध घेण्याकरिता या वाहनांचा वापर होणार आहे.

### इमारतीचा तळमजला घेतला भाडेतत्त्वावर

- पोलिस ठाण्याकरिता महानगरपालिकेकडून इमारतीचा तळमजला भाडेतत्त्वावर घेण्यात आला आहे. त्याचा भाडेखर्च पोलिस आयुक्तालयाच्या शासकीय निधीतून तसेच या इमारतीची डागडुजी, पार्टीशन व फर्निचरबाबतच्या खर्चाकरिता ठाणे जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झाला आहे.
- १ ऑक्टोबर २०२० पासून मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालय कार्यान्वित झाले असून सुरुवातीला १३ पोलिस ठाणी कार्यान्वित होती. मागील ३ वर्षांत प्रस्तावित ७ पैकी टप्प्याटप्प्याने आचोळे, मांडवी, पेल्हार, नायगाव पोलिस ठाणी व आज काशीगाव पोलिस ठाणे कार्यान्वित होत आहे.

म.टा. पु.पा.७.

# मच्छिमारांची 'तहसील'वर धडक

**राखीव जागेवर अतिक्रमण केल्याचा निषेध**



रोहित राऊत

म. टा. वृत्तसेवा, वसई

अर्नाळा येथे मच्छिमारांना मासळी सुकविण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर पुन्हा एकदा अतिक्रमण करण्यात आले आहे. मासळी सुकविण्यासाठी हक्काची जागा असूनही अतिक्रमणामुळे त्यांची कोंडी होत आहे. हे अतिक्रमण याआधी हटविण्यात आले होते. मात्र पुन्हा एकदा अतिक्रमण झाल्याने ते हटविण्यासाठी संतप्त मच्छिमार गुरुवारी थेट तहसील कार्यालयावर धडकले. यावेळी तहसील कार्यालयासमोरच मासळी सुकविण्यासाठी ठेवून याचा निषेध व्यक्त केला.

अर्नाळा गावातील नागरिकांच्या एकूण २७५ हून अधिक बोटी असून मासेमारी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. या एका ठिकाणी आठवड्याला सुमारे ५०० ते ६०० टन बोंबील, करंदी आणि मांदेळी यासारखी मासळी मच्छिमारांकडून आणली जाते. ती सुकवून मग पावसाळ्यात किंवा त्याच्या आधी त्याची विक्री केली जाते. या काळात त्यास मोठी मागणी असते. त्यामुळे जवळपास सर्वच मच्छिमार कुटुंबे सुक्या मासळीचा व्यवसाय करतात. मासळी सुकविण्यासाठी सरकारने मच्छिमारांसाठी अर्नाळा समुद्रकिनाऱ्यालगत ४० एकर जागा राखीव ठेवली असून येथे मच्छिमार संस्थेने मासळी सुकविण्यासाठी चौथरे बांधून दिले आहेत. मात्र त्या जागेवर अतिक्रमण झाल्याने मच्छिमारांची गैरसोय होत असून हे झालेले अतिक्रमण हटविण्याची मागणी येथील कोळी समाज राखीव जागा बचाव समितीतर्फे करण्यात येत आहे.

फेब्रुवारी २०२२ रोजी तत्कालीन तहसीलदार उज्वला भगत यांनी या जागेवरील हे अतिक्रमण हटवून मोठी कारवाई केली होती. मात्र पुन्हा एकदा येथे अतिक्रमण झाल्याने मच्छिमार वर्ग संतप्त झाला आहे. त्यामुळे यावर कारवाई करण्यासाठी गुरुवारी तहसीलदार कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले होते. शेकडोच्या संख्येने उपस्थित मच्छिमारांनी तहसील कार्यालयासमोरच मासळी वाळविण्यासाठी ठेवत निषेध व्यक्त केला. यावेळी अर्नाळा कोळी समाज राखीव जागा बचाव समितीचे अध्यक्ष इनास डेडू, पालघर जिल्हा मच्छिमार कृती समितीचे उपाध्यक्ष विजय थाटू, ठाणे जिल्हा मच्छिमार समाज संघाचे अध्यक्ष जनार्दन तांडेल, उपाध्यक्ष प्रमोद आरेकर, अर्नाळा मच्छिमार सोसायटीचे उपाध्यक्ष मोहन चाचूल्या, सचिव महेंद्र पाटील, भाजप वसई विधानसभाप्रमुख मनोज पाटील आणि मोठ्या संख्येने कोळी महिला, मच्छिमार बांधव उपस्थित होते.


CS CamScanner

लोकमत पृ.पा.१

## कुत्र्यांवरून वाद; दोघींची हाणामारी

**मीरा रोड :** मीरा रोडच्या रावलनगर, शांती विहारसमोर साईसृष्टी कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या शबाना समीर खान व शीतल दिनेश सावंत या दोघींमध्ये भटक्या कुत्र्यांना संकुलाच्या आवारात जेवण देण्यावरून वाद झाला. त्यातून दोघींनी एकमेकांविरुद्ध नयानगर पोलिस ठाण्यात तक्रारी नोंदवल्या आहेत. शीतल हिने ठोशाबुक्क्यांनी आपणास मारहाण करून शिवीगाळ, दमदाटी केली, अशी तक्रार शबाना यांनी दिली आहे, तर शबाना हिने शिवीगाळ, दमदाटी केली अशी तक्रार शीतल यांनी केली आहे.

## तरुणाने घेतला गळफास



**नालासोपारा :** गौराईपाडा येथील जगन्नाथ चाळीत राहणाऱ्या महेश वर्मा (३३) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी बुधवारी संध्याकाळी घरातील किचन रूममधील छताच्या पाइपला साडी बांधून गळफास घेत आत्महत्या केली आहे. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## पती-पत्नीस शिवीगाळ

**मीरा रोड :** भाईदर पूर्वेच्या एसव्ही मार्ग, रजनी पार्क भागातील समाधान अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या शिक्षिका चेतना जेठवा व त्यांचे पती हरिकिशन भाईदर पूर्व रेल्वे स्थानकाजवळून रात्री १० च्या सुमारास जात होते. यांना पंकज राजकुमार लखोटिया (३०, रा. बॉम्बे मार्केट, भाईदर पश्चिम) व वृषभ पटेल यांनी सार्वजनिक रस्त्यावर अश्लील शिवीगाळ, दमदाटी केली म्हणून नवघर पोलिस ठाण्यात पंकज व वृषभ या दोघांवर विनयभंगासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक निवास गाराळे हे तपास करत आहेत.

लोकमत पृ.पा.२.

## तरुणाच्या पोटावर केले चाकूने वार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सुरक्षा स्मार्ट सिटीजवळील आर्या फास्ट फूड येथे बुधवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास जितेंद्र सिंग उभे असताना एका अज्ञात आरोपीने कोणत्या तरी कारणावरून चाकूने वार केल्याची घटना घडली आहे. माणिकपूरच्या चुळणा रोडवरील व्हिक्टरी हाइट्समध्ये राहणारे नितीन धारपवार (५६) यांनी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

समय भास्कर



# शहर में हुआ नए पुलिस स्टेशन का उद्घाटन

पंकज दुबे/ मीरा-भाईंदर

14 मार्च को मीरा-भाईंदर, वसई-विरार, पुलिस आयुक्तालय के कार्यक्षेत्र में मीरा रोड के काशीगांव मे नये पुलिस स्टेशन का उद्घाटन महाराष्ट्र के उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने ऑनलाइन माध्यम से किया शहर में बढ़ती जनसंख्या को ध्यान में रखकर शहर मे सुरक्षा और क़ानून व्यवस्था बनी रहे इस लिहाज से पुलिस आयुक्तालय का यह 18 वा पुलिस स्टेशन बना अक्टूबर 2020 से पुलिस आयुक्तालय के कार्यक्षेत्र में कुल पुलिस स्टेशन की संख्या 13 थी, जबकि और नये पुलिस स्टेशन का निर्माण होना था जिसमे से विगत 3 वर्षो मे अचोले, मांडवी, पेल्हार, नायगांव का निर्माण हुआ और काशीगांव का यह पुलिस स्टेशन बनने से आयुक्तालय के कार्यक्षेत्र पुलिस स्टेशन की कुल संख्या 18 हो गयी राहुल कुमार पाटिल इस नये पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक होंगे

जिला नियोजन समिति ठाणे एवं पालघर की तरफ से पुलिस आयुक्तालय 2023-24 के लिये अतिरिक्त 48 वाहन दिये गये जो महिला एवं बच्चों की सुरक्षा, डायल 112, और पुलिस गस्त के लिये कारगर होंगे

इस उद्घाटन में आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, परिमंडल 1 के पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, महानगरपालिका आयुक्त संजय काटकर, विधायक गीता जैन, भाजपा नेता रवि व्यास, कांग्रेस नेता मुजफ्फर हुसैन, आदि उपस्थित थे।

CS CamScanner

# पकड़े गये जंगली सांभर हिरण का सींग बेंचने वाले तस्कर

## 60 लाख कीमत का सींग बरामद, दो गिरफ्तार




जागरण ज. संवाददाता

**वसई।** जंगली सांभर हिरण के सिंग की बिक्री करने वाले दो आरोपियों को पेल्हार पुलिस ने गिरफ्तार किया है। जिनके पास से दो जंगली सांभर हिरण के सिंग बरामद हुए हैं। जिसकी कीमत लगभग 60 लाख रुपए है। पेल्हार पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक सोपान पाटिल को गुप्त सूचना मिली थी कि दो व्यक्ति एपल इंडस्ट्री, पेल्हार नालासोपारा पूर्व में सिंग की बिक्री करने आने वाले हैं। जिसकी सूचना पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी को दी।

वरिष्ठ अधिकारियों के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक सोपान पाटिल, पुलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपले और डिटेक्शन अधिकारियों ने एपल इंडस्ट्री, पेल्हार नालासोपारा पूर्व में जाल बिछाया। जैसे ही दोनों आरोपी वहां आए पुलिस ने पड़कर उनकी जांच की तो उनके पास से जंगली हिरण की एक सिंग बरामद की गई। जिसकी जांच के लिए संजय गांधी राष्ट्रीय उद्यान में भेजा गया। जांच में पता चला कि यह जंगली सांभर हिरण की सींग है। दोनो आरोपियों से अधिक जांच की गई तो उनके पास से एक और सांभर हिरण का सिंग बरामद किया गया। जिसकी कीमत 10 लाख रुपए है। गिरफ्तार दोनों आरोपियों का नाम मोहम्मद इमरान फरियादअली शाह (42) और अशोक पटेल (48) है। दोनों आरोपी वसई पालघर के रहने वाले हैं।

इन आरोपियों ने जिस रिक्शा रिक्शे में सांभर हिरण के सींग को लाये थे। उस रिक्शा और उनके पास से दो मोबाइल जप्त किया गया है। जिसकी टोटल कीमत 61 लाख 20 हजार है। फिलहाल पुलिस इन दोनो आरोपियों से यह जांच कर रही है, कि इन लोगों ने सांभर हिरण का सिंग कहां से लाये थे और किसको सप्लाई करने वाले थे।

CamScanner